
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



# दैनिक राजस्व

RNI. NO. MAHMAR 2011/39185



सोलापूर | वर्ष १४ वे | अंक - २१५ | मराठी सायंदैनिक | शनिवार २९ नोव्हेंबर २०२५ | पाने ६ | किंमत २ रुपये

# राष्ट्रप्रथम नाही, आता भ्रष्ट प्रथम, भाजपकडून सोलापुरात ३०० कोटी आले

## उत्तम जानकरांचा सनसनाटी दावा



**सोलापूर :** आपल्या खळबळजनक वक्तव्याने आणि दाव्याने ओळखले जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरसमधील आमदार उत्तम जानकर यांनी पुन्हा एकदा खळबळजनक आरोप केला आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर एकट्या सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकेत पैसे वाटण्यासाठी भाजपकडून ३०० कोटी रुपये आले आहेत. प्रत्येक नगरपालिकेला किमान २५ कोटी रुपये, अशा पद्धतीने पैसे पक्षाकडून आले असून सर्वात भ्रष्ट असा पक्ष भाजपा आहे, असा गंभीर आरोप आमदार उत्तम जानकर यांनी केला आहे. एका बाजूला नगरपालिका निवडणुका या पैसेवाल्यांच्या झाल्याची टीका सर्वच विरोधी पक्षातून होत असताना आज जानकर यांनी थेट भाजपने जिल्ह्यासाठी ३०० कोटी रुपये पाठवल्याचा आरोप केला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असता नेते मंडळींच्या प्रचाराने वेग घेतला आहे. त्यातच, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह बडे नेते प्रचाराच्या मैदानात उतरले असून लक्ष्मीदर्शनाचीही




जोरदार चर्चा सुरू आहे. मताला १०००, मताला २००० असे म्हणत काही ठिकाणी मतदारांचा रेट ठरवला जात असल्याची चर्चा आहे. तर, पक्षाकडून निवडणुकांसाठी पैसेही आल्याचं सांगण्यात येत आहे. शिवसेना नेते तथा मंत्री गुलाबराव पाटील यांनी चक्क लक्ष्मीदर्शन होणार आहे, बाहेर झोपा असा सल्लाच कार्यकर्त्यांना, मतदारांना दिला होता. तर, आमदार अब्दुल सत्तार यांनीही काजू, किसमिस समजून पैसे घेण्याचा सल्ला दिला. आता, आमदार उत्तम जानकर यांनी गंभीर आरोप केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकेत पैसे वाटण्यासाठी भाजपकडून ३०० कोटी रुपये आले आहेत. प्रत्येक नगरपालिकेला किमान २५ कोटी रुपये, अशा पद्धतीने पैसे पक्षाकडून आले आहेत. मी ३० वर्षे भारतीय जनता पार्टीत होतो, तेव्हा राष्ट्रप्रथम हे पक्षाचे स्लोगन होते. मात्र, आता भ्रष्टप्रथम आणि मुस्लिम खतम हे नवीन स्लोगन या निवडणुकीत आल्याचा टोला उत्तम जानकर यांनी लगावला. पूर्वी अटलजींची जी भाजप होती त्यामध्ये आता भ्रष्ट लोक भरली असून पक्षाची गटारगंगा झाली आहे. पूर्वीची तत्वे काही राहिली नसून केवळ भ्रष्टाचार एवढ्या एकाच मुद्द्यावर हे सर्व एकत्र येत आहेत, असे जानकर यांनी म्हटले. तसेच, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावरही सडकून टीका करत, जिथे भाजप चौथ्या नंबरवर आहे तिथे कोणाचेही पैसे घ्या आणि मत आम्हाला या अशी भाषा पालकमंत्री वापरत असल्याचे जानकर यांनी म्हटले. सध्या राज्यात तीन पक्षांच्या सरकारचे जे चित्र आहे ते फार काळ टिकणार नाही, यातून लवकरच मोठा स्फोट झालेला दिसेल असा दावाही आमदार जानकर यांनी केला आहे.



# रामदास आठवले एकटे पडल्याने हतबल, म्हणाले, 'महायुतीकडे जागासांठी भीक मागावी लागते'

महायुतीतून जागा मिळाव्या म्हणून आपल्याला भीक मागावी लागते, अशी खंत व्यक्त करत आरपीआय गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान त्यांच्या या वक्तव्याने आरपीआय गट आगामी निवडणुकांसाठी स्वबळाची तयारी करत आहे का? असा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

दरम्यान, यासंदर्भात बोलताना आरपीआय गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आपल्याच पक्षावर नाराजी व्यक्त केलीय. निवडणुका आल्या की सगळे पक्ष सर्व जागा लढण्याच्या तयारीत असतात, परंतु आमच्या पक्षात अजिबात तसं नाही, जागांसाठी इतर पक्षांकडे भीक मागावी लागते, असं विधान करत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केलीय.

युती न झाल्यास शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत जाणार

पिंपरी चिंचवड शहरात आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात केंद्रीय मंत्री रामदास आठवले बोलत होते. आगामी महानगर पालिका निवडणुकीत पिंपरी- चिंचवडमध्ये आठवले यांनी भाजपकडे युतीचा हात पुढे केला. त्यांच्यासोबत युती न झाल्यास शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत जाणार असल्याचेही त्यांनी म्हटलंय. तर पिंपरीत युतीसाठी त्यांनी ८-९ जागांवर दावा केलाय, अशी देखील माहिती आहे. परिणामी महायुतीने रामदास आठवलेंच्या पक्षाला अडगळीत टाकलंय का? असा प्रश्न आता राजकीय वर्तुळातून विचारला जाऊ लागला आहे.

महानगरपालिकेला रामदास आठवलेंच्या आरपीआय पक्षाची स्वबळाची तयारी?

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार संपण्यासाठी आता अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. आज दुपारी पाच वाजता या निवडणुकांसाठीचा प्रचार संपुष्टात येईल. त्यानंतर मंगळवारी मतदानाची प्रक्रिया पार पडेल. महाराष्ट्रात एकूण २८० जागी निवडुक सुरु आहे. त्यामध्ये २५६ ठिकाणावर भाजप कमळावर निवडणूक लढवत आहे. तर अनेक ठिकाणी महायुतीतील मित्र पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहे. अशातच आता महायुतीच्या गोटातून एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महायुतीतून जागा मिळाव्या म्हणून आपल्याला भीक मागावी लागते, अशी खंत व्यक्त करत आरपीआय गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान पिंपरी-चिंचवडमध्ये आठवले यांनी भाजपकडे युतीचा हात पुढे केला. त्यांच्यासोबत युती न झाल्यास शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत जाणार असल्याचेही त्यांनी म्हटलंय. तर पिंपरीत युतीसाठी त्यांनी ८-९ जागांवर दावा केलाय. त्यामुळे आता महायुतीत आरपीआय गटाची मनधरणी केली जाते का, कि रामदास आठवले 'एकला चलो रे' चा नारा देतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.



# पोलीस बसले बाजुला, अल्पवयीन मुलगा ठेवला उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेला

अकोला : राज्यातील नगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचाराला अंतिम गती प्राप्त झाली आहे. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज अकोला जिल्ह्यातील हिवरखेड येथे प्रचारसभेसाठी येणार होते. मात्र, या सभेला येणाऱ्या महिलांची तपासणी चक्क पोलिसांनी शिंदे गटाचा कार्यकर्ता असलेल्या एका अल्पवयीन मुलाच्या हाती दिल्याचं पाहायला मिळालं. या मुलाच्या गळ्यात शिवसेनेचा गमछा आणि डोक्यावर शिवसेनेची कॅप दिसून येत आहे. विशेष म्हणजे, शेजारीच चार ते पाच महिला पोलीस कर्मचारीही बसलेल्या आहेत. त्यामुळे, पोलीस बसले बाजुला आणि अल्पवयीन मुलगा ठेवला उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेला अशी चर्चा सभास्थळी रंगली आहे.

एकनाथ शिंदेंच्या सभेला येणाऱ्या महिलांची मेटल डिटेक्टरमधून तपासणी करताना या अल्पवयीन मुलाचा व्हिडिओ एबीपी माझाच्या कॅमेऱ्याने कैद केला आहे. खरंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना झेड प्लस सुरक्षा व्यवस्था आहे. मात्र, त्यांच्या सभास्थळी सुरक्षेतील ही चोटचूक एखाद्या वेळेस मोठी चूक ठरू शकते. कारण, पोलीस यंत्रणेचा हा मोठा गहाळपणा दिसून येत असून अकोला पोलीस या महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार का? हा सवाल आता या निमित्ताने निर्माण झाला आहे.

दरम्यान, तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड येथील शिवसेनेच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा रद्द करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. अमरावती येथील बेलोरा विमानतळावरून विमान उडविण्यास वैमानिकांनी नकार दिल्याने एकनाथ शिंदे फोनवरून सभेला संबोधित करण्याची शक्यता आहे. अकोट, तेल्हारा, मुर्तिजापूर आणि हिवरखेड नगरपालिकेच्या उमेदवारांचा एकत्रित प्रचारासाठी हिवरखेडमध्ये शिंदेंची सभा होती. यासभेला एकनाथ शिंदे येणार नसल्याने सभेसाठी आलेल्या लोकांचा हिरमोड झाल्याचं दिसून आलं.

मुख्यमंत्री फडणवीसांचीही झाली सभा

अकोला जिल्ह्यातील पहिल्यांदाच होत असलेल्या हिवरखेड नगरपालिकेच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे. २६ ऑगस्ट २०२४ ला हिवरखेड ग्रामपंचायतीचे थेट नगरपालिकेत रूपांतर करण्यात आले. त्यामुळे, नगरपालिकेत पहिले सत्ताधारी होण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या हिवरखेड गावचं राजकीय वातावरण सध्या चांगलंच तापलं.

# कामगारांच्या पाच अत्यावश्यक हक्कांकडे सरकारचे दुर्लक्ष!

केंद्र सरकारने २०१९-२० मध्ये संमत केलेल्या चार कामगार संहितांची अंमलबजावणी अचानक वेगाने सुरू केली आहे. गेल्या पाच–सहा वर्षांत सरकारने या संहितांना रोखून धरले होते. कारण कामगार संघटना, उद्योग क्षेत्र आणि अनेक राज्यांनी उपस्थित केलेल्या मूलभूत शंकांना अद्याप स्पष्ट उत्तर मिळाले नव्हते. आज निवडणुकीच्या पूर्वसंध्येला हा निर्णय घेतला जात असताना दोन गंभीर प्रश्न पुढे येतात. ते म्हणजे,

(१) या घाईचा लाभ कोणाला?

(२) या संहितांमधून भारताच्या कामगारांच्या पाच अत्यावश्यक मागण्यांना न्याय मिळतो का?

२९ कायद्यांचे संहितांमध्ये पुनपकेजिंग, परिणाम अस्पष्टच

सरकारचे म्हणणे आहे की जुन्या २९ कामगार कायद्यांचे एकत्रिकरण करून श्रम कायदे अधिक सोपे, एकसमान आणि पारदर्शक होणार आहेत. परंतु प्रत्यक्षात, अनेक राज्यांमध्ये नियम अजून अधिसूचितच नाहीत. त्यामुळे या संहितांचा प्रत्यक्ष अंमल नेमका कसा होणार, हे पूर्णपणे अनिश्चित आहे.

पीएलएफएस च्या ताज्या आकडेवारींनुसार देशातील ९१% कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. अशा व्यापक आणि विषम श्रमिक अर्थव्यवस्थेत कोणतेही श्रम सुधार पायाभूत जीवनावर थेट परिणाम करतात. या पार्श्वभूमीवर संहितांची आजची स्थिती ही अपूर्ण, अस्पष्ट आणि असंतुलित दिसते.

कामगारांच्या पाच अत्यावश्यक मागण्या – आणि अपूर्ण संहिता

देशातील कामगारांच्या पाच मूलभूत मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. नव्या संहितांमध्ये त्यांना कितपत स्थान मिळाले आहे?

१) राष्ट्रीय किमान वेतन ‐ प्रतिदिन ४०० रुपयांची हमी नसलेला कायदा

राष्ट्रीय किमान वेतनाची संकल्पना संहितांमध्ये असली तरी त्याची रक्कम, पुनरावलोकन व्यवस्था आणि महागाईशी निगडित वाढ याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. भारतात वाढत्या जीवनमानाच्या खर्चाचा विचार करता ४०० रुपये प्रतिदिन हा तातडीचा आणि किमान अपेक्षित हक्क आहे. परंतु संहितांमध्ये त्याची हमी नाही.

२) सर्वांसाठी आरोग्य संरक्षण -२५ लाखांचे सार्वत्रिक कवच अजूनही कल्पनाच

देशातील ६० % पेक्षा जास्त नागरिक खासगी आरोग्यसेवेवर अवलंबून आहेत. असंघटित काम गारांना सहज उपलब्ध आणि वापरता येईल असे सार्वत्रिक आरोग्य सुरक्षा जाळे संहितांमध्ये नाही. आरोग्य हा मूलभूत हक्क असतानाही या विषयावर संहितांमध्ये गंभीर पोकळी आहे.

३) शहरी रोजगार हमी – संहितांमध्ये अनुपस्थित

ग्रामीण भागात मनरेगा हे लाखो घरांचे जीवनरक्षण करते. परंतु शहरांमधील बेरोजगार युवक–महिलांसाठी कोणत्याही शहरी रोजगार हमी कायद्याची तरतूद नाही. बेरोजगारी ७ ते ८ % आणि युवक बेरोजगारी अनेक राज्यांत १५ % च्या वर असताना हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे.

४) असंघटित आणि गिग कामगारांची सामाजिक सुरक्षा तरतुदी अपुऱ्या

निती आयोगाच्या अहवालानुसार भारतात सुमारे ७७ लाख गिग कामगार आहेत; २०३० पर्यंत हा आकडा कोट्यवधींवर जाणार आहे. परंतु संहितांमध्ये अपघात विमा, जीवन विमा, पेन्शन, मातृत्व लाभ, तक्रार निवारण प्रणाली यांची स्पष्ट, जबाबदार आणि अंमलबजावणीय तरतूद नाही. महिला कामगारांच्या सुरक्षिततेबाबतही संहितेत स्पष्ट धोरण नाही.

५) सरकारी क्षेत्रातील कंत्राटी भरतीवर नियंत्रण- तरतूद शून्य

आज सरकारी विभागातील मूलभूत आणि मुख्य कामे मोठ्या प्रमाणात कंत्राटावर चालतात. नव्या संहितांमध्ये या प्रवृत्तीला आळा घालण्याची कोणतीही प्रभावी तरतूद नाही. त्यामुळे ही अस्थिर रोजगार रचना आणखी गहिरी होण्याचा धोका आहे.

कामाचे तास : ८ तासांवरून १२ तासांचा मार्ग?

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९१९ मध्ये ‘आठ तास काम – आठ तास विश्रांती – आठ तास वैयक्तिक जीवन’ ही शिफारस केली होती. भारतानेही हे तत्त्व स्वीकारले. मात्र नव्या संहितांमध्ये शिफ्ट १२ तासांपर्यंत वाढवण्याची मुभा दिली आहे. यामुळे महिलांच्या सुरक्षिततेवर परिणाम, आरोग्याचे धोके, उत्पादकतेतील असमतोल, असंघटित क्षेत्रातील शोषण या सर्व चिंतांना पुन्हा निमंत्रण दिले गेले आहे.

संघटना मान्यता : ५१ % नियमाने संघटनांना मोठा धक्का

नव्या नियमानुसार कोणत्याही कामगार संघटनेला मान्यता मिळण्यासाठी ५१% सदस्यत्व अनिवार्य केले आहे. अनेक औद्योगिक केंद्रांमध्ये कामगार विविध संघटनांत विभागलेले असतात; त्यामुळे ५१% मिळणे जवळपास अशक्य. हा नियम प्रत्यक्षात संघटना कमकुवत करण्याचा मार्ग ठरू शकतो.

छाटणी आणि कारखाना बंद ‐ १०० वरून ३०० कामगार मर्यादा

पूर्वी १०० कामगारांवरील उद्योगांना छाटणी किंवा बंद करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक होती. आता ही मर्यादा ३०० करण्यात आली आहे. यामुळे, तात्पुरत्या आणि कराराधीन कामगारांचा रोजगार आणखी असुरक्षित, आउटसोर्सिंग व स्वयंचलनाला प्रोत्साहन, रोजगाराऐवजी नफ्याधारित पुनर्रचना ही प्रक्रिया वेगाने वाढणार आहे. सामाजिक सुरक्षा निधी, नोंदणी, विमा, ॲग्रिगेटर कंपन्यांवर जबाबदारी अशा तरतुदी आहेत. केंद्र सरकारने या प्रगत प्रारुपामधून शिकण्याची गरज होती; पण केंद्राचा भर उद्योगसुलभतेवर जास्त आणि कामगार संरक्षणावर कमी दिसतो.

राज्य–केंद्र समन्वयाचा अभाव ‐ संहितांची अंमलबजावणी अनिश्चित

कामगार संहिता लागू होण्यासाठी केंद्र आणि राज्य दोघांनीही नियम अधिसूचित करणे आवश्यक आहे. आजही अनेक राज्यांचे नियम अंतिम नाहीत, सार्वजनिक चर्चा कमी, उद्योग–कामगार–राज्य सरकार समन्वय प्रभावी नाही म्हणून प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी आणि कशी होईल, हे अस्पष्टच आहे.

संहितांची अंमलबजावणी होणार ‐ पण कोणत्या दिशेने?

कामगार संहिता अखेरीस लागू होतीलच, परंतु त्या भारताच्या कामगारांना न्यायाच्या दिशेने नेतील की अस्थिरतेच्या दिशेने, हे सरकारच्या पुढील भूमिकेवर अवलंबून असेल.

भारताच्या कामगारांचे पाच मूलभूत हक्क असे आहेत:

राष्ट्रीय किमान वेतन ४०० रुपये

सार्वत्रिक आरोग्य संरक्षण

शहरी रोजगार हमी

असंघटित व गिग कामगारांची सामाजिक सुरक्षा

सरकारी कामांतील कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर नियंत्रण

हे हक्क न मिळाल्यास श्रम सुधारणा ही संकल्पना अपूर्णच राहते.

आज भारताला उद्योगसुलभता जितकी आवश्यक आहे, तितकेच कामगार न्याय सुद्धा आवश्यक आहे. कामगारांना केवळ संहितांचे पुनपकेजिंग नको, तर प्रत्यक्ष, न्याय्य, सुरक्षित आणि मानवी भविष्याची हमी हवी आहे.

# शरीराची फंक्शनल चेन कसं काम करते?

कविता काकूंच वय ५८ वर्षे. वयानुरूप होणाऱ्या गुडघे दुखीसाठी आमच्या बाह्य रुग्ण विभागात येत होत्या, त्यांच्या व्यायामामध्ये गुडघ्यांच्या स्नायूंसहित खुब्याचे स्नायू, पोटरीचे स्नायू आणि काही पोटाच्या स्नायूंचे व्यायाम देखील होते. साधारण १० दिवसांच्या उपचारानंतर, त्यांना गुडगेदुखी मधे बराच फरक जाणवत होता. त्यांनी मला उपचारा दरम्यान एक प्रश्न विचारला, जो त्यांच्यासाठी अगदी साहजिक होता, त्या म्हणाल्या मला त्रास तर फक्त गुढगेदुखीचा आहे, पण आपण व्यायाम मात्र पार पोटाच्या स्नायूंपासून ते पोटरीच्या स्नायूंपर्यंत करतो आहोत, आणि मला बरही वाटतं आहे. याचाच अर्थ पोटाच्या स्नायूंपासून ते पोटरीच्या स्नायूंपर्यंत शरीर एखाद्या चेन सारखं काम करतंय का? काकूंना पडलेला प्रश्न आणि त्यांनी त्या प्रश्नाचं उत्तर शोधताना शरीराला दिलेली चेनची उपमा अगदी बरोबर होती.

काकूंचं म्हणणं बरोबर होतं. गुडघा दुखण्याचं मूळ कारण फक्त गुडघ्यात नव्हतं, तर शरीराच्या चेन मधे दडलेलं होतं. बहुतेक स्नायू आणि हाडांच्या वेदना या शरीराच्या फंक्शनल चेनने प्रभावित होतात. कसं ते आपण आज पाहूया.

पाय: शरीराचा पाया

शरीराचा पाया म्हणजे पाय. प्रत्येक पावलावर शरीराचं ३ ते ५ पट वजन पडतं. जर पायाची रचना थोडी बदलली (उदा. फ्लॅट फूट, हाय आर्च) किंवा चुकीची चालण्याची सवय लागली, तर शरीराचा समतोल बिघडतो. हा असमतोल गुडघा, कंबर आणि मणक्यांपर्यंत वर जातो. म्हणजे वेदना जिथे जाणवते, ती तिथे सुरू झालेलीच असेल असं नाही. बर्याच वेळा पायातील छोटा बिघाड गुडघेदुखी किंवा पाठीच्या वेदनेचं कारण ठरतो.

२० डिसेंबरपासून ‘या’ ४ राशींचा सुवर्णकाळ सुरू! धन देणारा शुक्र देणार प्रचंड पैसा; तिजोरीत धनसंपत्ती वाढेल अन् व्हाल श्रीमंत

‘या’ तारखेला जन्मलेल्या मुली करिअरमध्ये गाठतात मोठं यश! त्यांना चापलुसी, खोटेपणा, दिखावा अजिबात आवडत नाही

कंबर, गुडघे आणि खुबा – जोडणारा दुवा

खुबा, कंबर आणि गुडघे हे तीन भाग शरीराच्या हालचालींच्या साखळीत एकमेकांना जोडलेले असतात. गुडघ्याच्या स्थैर्यासाठी खुब्याचे स्नायू महत्त्वाचे असतात, ते चालताना पायाला योग्य दिशेनं पुढे नेतात आणि गुडघ्यावरचा भार संतुलित ठेवतात. हे स्नायू कार्यक्षम नसतील, तर गुडघ्याचा कोन बदलतो, चालताना घर्षण वाढतं आणि कार्टिलेज झिजतं. त्यामुळे केवळ गुडघ्यावर काम करून उपयोग होत नाही, खुब्याच्या स्नायूंची कार्यक्षमता वाढवणं आवश्यक असतं.

कोअर स्नायू (पोटाचे स्नायू) आणि मणका – स्थैर्याचा आधार

कंबर आणि पोटाभोवतीचे स्नायू (कोअर) शरीराला स्थैर्य देतात. हे स्नायू मजबूत असतील, तर चालताना प्रत्येक हालचाल नियंत्रित राहते. पण जर कोअर पूर्ण क्षमतेने काम करत नसेल, तर शरीराचा गुरुत्वमध्य बदलतो, वजन चुकीच्या दिशेनं जातं आणि खुब्यावर, गुडघ्यांवर आणि एकंदरीत पायांवर येणारा भार वाढतो.

# घामामुळे अंगाला घाण वास येतो, परफ्यूम-डिओ लावूनही दुर्गंधी लपेना? २० रुपयांच्या ‘या’ पांढऱ्या पदार्थाने कधीच येणार नाही बॉडी स्मेल

उन्हाळा असो वा पावसाळा, घामाची दुर्गंधी त्रास देणारीच ठरते. बाजारातील डिओड्रंट्स, परफ्युम्सवर हजारो रुपये खर्च करूनही परिणाम काही वेळापुरतेच टिकतात. पण, घरात सहज मिळणाऱ्या एका वस्तूच्या छोट्याशा तुकड्याने दुर्गंधी पूर्णपणे नाहीशी होऊ शकते. बाजारातील केमिकलयुक्त स्प्रे किंवा डिओड्रंट्स न वापरता, केवळ २० रुपयांत मिळणाऱ्या ‘या’ चमत्कारी वस्तूमुळे तासन्तास राहाल फ्रेश. ही जादुई गोष्ट नेमकी काय आहे? वाचा पुढे

दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात घाम आणि त्यातून निर्माण होणारी दुर्गंधी ही प्रत्येकासाठी मोठी समस्या असते. अनेक जण या वासाला झाकण्यासाठी महागडी सुगंधी द्रव्ये किंवा डिओड्रंट्स वापरतात. पण, ही रासायनिक उत्पादने केवळ तात्पुरता परिणाम करतात, शिवाय त्वचेवर दुष्परिणाम होण्याचा धोका असतो. आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे या समस्येवर कायमचा तोडगा एका साध्या आणि स्वस्त वस्तूमध्ये लपलेला आहे - फक्त २० रुपयांची तुरटी.

तुरटी काय काम करते?

तुरटीमध्ये नैसर्गिक जंतुनाशक गुणधर्म असतात. हे गुण घामातून निर्माण होणाऱ्या जीवाणूंना नष्ट करतात. परिणामी, शरीरातून येणारी दुर्गंधी नाहीशी होते. त्यातील गुणधर्म त्वचेला घट्ट करतात आणि रोमछिद्र तात्पुरते आकुंचन पावतात. यामुळे त्वचेच्या पृष्ठभागावर पोहोचणाऱ्या घामाचे प्रमाण कमी होते आणि शरीर दीर्घकाळ ताजेतवाने राहते.

तुरटीचा वापर कसा करावा?

अंघोळ करताना : अंघोळीच्या पाण्यात तुरटीचा लहानसा तुकडा टाका. काही मिनिटांत तो विरघळेल आणि त्या पाण्याने अंघोळ करा, त्यामुळे संपूर्ण शरीरावरील दुर्गंधी नाहीशी होईल.

थेट वापर : तुरटीचा तुकडा पाण्यात भिजवून काखेखाली हलक्या हाताने चोळा. हे जंतुनाशक गुणधर्मांमुळे दुर्गंधी करणारे जीवाणू मारेल व त्वचेला घट्टपणा देईल. मात्र, जर खाज किंवा जळजळ जाणवली तर वापर थांबवा.

पावडर स्वरूपात : तुरटी बारीक वाटून पावडर तयार करा आणि ज्या भागांत जास्त घाम येतो तिथे लावा.

फायदे काय?

रासायनिक डिओड्रंट्स व सुगंधी द्रव्यांच्या दुष्परिणामांपासून बचाव.

अत्यंत स्वस्त व सहज उपलब्ध.

परिणाम दीर्घकाळ टिकणारा.

दुर्गंधीवर मुळातून नियंत्रण.

महागड्या परफ्यूमच्या मोहापेक्षा तुरटी हा घरगुती उपाय केवळ स्वस्तच नाही तर अत्यंत परिणामकारक आहे. किराणा दुकानात सहज मिळणाऱ्या या छोट्याशा वस्तूमुळे तुम्ही दिवसभर ताजेतवाने राहू शकता. पुढच्यावेळी दुर्गंधीपासून सुटका हवी असेल तर शंभर रुपयांचा डिओ न वापरता फक्त २० रुपयांची तुरटी वापरून पाहा आणि परिणाम पाहून तुम्हीही थक्क व्हाल.

# दिवसाला किती केळी खाल्ली पाहिजेत? पद्धत व प्रमाण पाळल्यास मेंदूला होतो ‘असा’ फायदा

पौष्टिक, आरोग्यदायी, स्वादिष्ट आणि सहज उपलब्ध असणारे कोणते फळ असेल तर ते केळ आहे. केळं सुपरफूड म्हणून ओळखले जाते. कारण - त्यात जीवनसत्वे, फायबरचे प्रमाण जास्त असते. केळं खाल्यावर तुम्हाला पोट भरल्याची भावना मिळते; जी तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते; असे पुणे येथील बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी सल्लागार डॉक्टर सुहास उदगीरकर म्हणाले आहेत.

पण, इन्स्टाग्रामवरील मिशेल थॉम्पसन या इन्फ्लुएन्सरने रीलमध्ये दावा केला आहे की, दिवसाला १७ केळी खाते. पण, ही पद्धत आरोग्यदायी आहे का? याबद्दल डॉक्टरांनी त्यांचे मत मांडले आहे.

एका आहारतज्ज्ञ आणि युजरने कमेंटमध्ये लिहिले की, एका दिवसात १७ केळी खाल्ल्याने काही चिंता सुद्धा निर्माण होतात

१. उष्मांकाच्या दृष्टिकोनातून पहिले तर १७ केळी खाल्ल्यास अंदाजे १,७८५ कॅलरीज मिळतात आणि त्यात २३८ ग्रॅम नैसर्गिक साखर असते; यामुळे रक्तातील साखरेमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते आणि त्यानंतर क्रॅश होऊ शकते.

२. दररोज दिवसाला १७ केळी खाल्ल्यास कालांतराने इन्सुलिन प्रतिरोधकता वाढू शकते.

३. पोटॅशियमचे प्रमाण - केळी नैसर्गिकरित्या पोटॅशियमने समृद्ध असतात (प्रति केळी सुमारे ४२२ मिलीग्राम). त्यामुळे १७ केळी खाल्ल्याने अंदाजे ७,१७४ मिलीग्राम पोटॅशियम मिळते; जे महिलांसाठी शिफारस केलेल्या सेवनापेक्षा खूपच जास्त आहे (२,६००-३,००० मिलीग्राम/दिवस); असे त्यात म्हटले आहे.

डॉक्टर सुहास उदगीरकर म्हणाले की, एका दिवसात १७ केळी खाऊ नये. आरोग्यसाठ चांगले, सहज उपलब्ध आणि स्वस्त असणाऱ्या केळीचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास पंचनाशी संबंधित त्रास होऊ शकतो आणि पुढील काही आरोग्याच्या समस्या देखील निर्माण होऊ शकतात.

१. केळी तुमच्या आहारात फायबर जोडण्याचा एक उत्तम मार्ग असला तरीही जास्त खाल्ल्याने पोट खराब होणे, मळमळ होणे, उलट्या होणे, पोट फुगणे किंवा गॅस होणे यासारख्या पचनाच्या समस्या उद्भवू शकतात.

२. मधुमेही असलेल्यांनी संतुलित आहार घ्यावा; ज्यामध्ये सर्व मॅक्रोन्यूट्रिएंट्स, कार्बोहायड्रेट्स, फॅट आणि प्रथिने यांचा समावेश असतो.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

# गोड गोळीचे विष, कामगारांचा श्वास कुणाच्या तिजोरीत, कुणाचा नाश?

## लेखन :संजय घालप

कायद्यांचं नवनीकरण हे काळाची गरज असली, तरी त्या नावाखाली कामगारांच्या पाठीवरून 'नवीन व्यवस्थेचा' कस लागत असेल, तर त्या प्रगतीला अर्थ राहत नाही. नवीन कामगार संहितांबाबत सरकारने केलेल्या गोड घोषणांमागे कटू वास्तव दडलेले आहे. बदलत्या युगाला साजेशा सुधारणा म्हणून या संहितांचं कौतुक होत असलं, तरी कामगार संघटनांनी व्यक्त केलेली भीती पाहता हा बदल उद्योगांच्या फायद्याचा आणि कामगारांच्या हक्कांवर घाला घालणारा ठरत असल्याचं स्पष्ट संकेत दिसतात.

एकोणीस-वीस चुका दुरुस्त करण्याच्या नावाखाली एकतीस-एकोणतीस कायद्यांचं एकत्रीकरण झाले. प्रक्रिया सरळ होईल, कामगार समस्यांचे मार्ग खुलतील, असा दावा करण्यात आला. पण प्रत्यक्षात या संहितांमध्ये कामगारांच्या संरक्षणाचे आधारस्तंभच शिथिल केले गेले आहेत. औद्योगिक संबंध संहितेनं संप, छाटणी आणि कामबंदीशी संबंधित नियम इतके कठोर केले आहेत की संघटित कामगारांची ताकद यातून जवळजवळ निष्प्रभ होते. ही स्थिती फक्त कायद्याची नाही, तर सामाजिक संतुलनाच्या धाग्याची आहे.

यातून पुढे येणारी सर्वात मोठी चिंता म्हणजे 'हायर-अँड-फायर' संस्कृतीला मिळालेलं सरकारी समर्थन. नोकरी देणं आणि काढणं उद्योजकांसाठी अधिक सोपं; पण कामगारासाठी त्यानंतरचं आयुष्य किती कठीण, हे ज्या हातांनी कायदे बनवले त्यांना कधीच जाणवत नाही. महागाईच्या तडाख्यात दैनंदिन खर्चाची सांगड घालणाऱ्या लाखो कामगारांच्या पोटावर हा कायदा पडतो. बेसिक वेतन अनिवार्य वाढेल ही गोष्ट भविष्यात लाभदायक खरी; पण टेक-होम पगार कमी होणं आजच्या जगण्यातल्या जखमांवर मीठच चोळणार आहे.

महिलांना रात्रीच्या शिफ्टची परवानगी आधुनिक वाटते; पण सुरक्षेच्या तरतुदीतली पोकळी ही त्याहून मोठी भीती निर्माण करणारी. सुरक्षितता, वाहतूक, निरीक्षण यांसारख्या मूलभूत गोष्टींना ठोस चौकटच नसताना ही 'सवलत' प्रत्यक्षात शोषणाचे नवीन मार्ग उघडू शकते. त्यात १२ तासांच्या शिफ्टचा संभाव्य गैरवापर हा तर वेगळाच धोका.

उद्योगजगताचे काही तज्ज्ञ दीर्घकालीन फायद्यांचा युक्तिवाद मांडतात. पण ग्रामीण भागातील लघुउद्योग, असंघटित क्षेत्रातील लाखो कामगार आणि अंमलबजावणीची गुंतागुंत या सर्वांचा विचारच या संहितांमध्ये गहाळ दिसतो. कायदे सुंदर असले, तरी त्यांच्या अंमलबजावणीचा पाया कमकुवत असेल, तर नफा आणि नुकसान यांच्या चढाओढीत सर्वात आधी कामगारच पायाखाली तुडवले जातात.

या सर्वांच्या पार्श्वभूमीवर प्रश्न एकच उरतो: बदलत्या युगात कामगारांना संरक्षण मिळत आहे की धोका? उद्योगांना स्वातंत्र्य देणं चुकीचं नाही; पण कामगारांच्या हक्कांची कात्री बनवणं हे कोणत्याही लोकशाहीशी सुसंगत नाही. प्रगतीचा रथ पुढे धावला पाहिजे, पण त्याच्या मागच्या चाकाला कामगारांचा पाठिंबा नसेल, तर प्रवास अखेरीस दरीतच संपतो.

सरकारने ही संहिता पुन्हा तपासून पाहण्याची गरज आता अत्यंत तातडीची आहे. कामगार संघटनांशी संवाद, सुरक्षिततेच्या तरतुदींचे पुनर्परीक्षण, टेक-होम पगाराचे संतुलन आणि हायर-अँड-फायर संस्कृतीवरील काटेकोर नियंत्रण ‐ या सर्व गोष्टी प्रत्यक्षात उतरल्यानंतरच या संहितांना प्रगतीचं नाव देता येईल.

प्रश्न कायदे बनवण्याचा नाही, तर कामगारांच्या कण्याला बळ देण्याचा आहे. देशाच्या विकासाचा पाया हा उद्योगांच्या नफ्यात नाही, तर कामगारांच्या सन्मानात आहे. कामगारांचा कणा कमकुवत झाला की प्रगतीचे सर्व मनोरे कागदाचे ठरतात.

# २५ कोटीच्या पीकहानी अनुदान अपहारातील आठवा आरोपी अटक




जालना – बनावट दस्तऐवज तसेच शासकिय संगणक प्रणालीचा गैरवापर करून कृषी नुकसानीबद्दल शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या २४ कोटी ९० लाख रुपये अनुदानाचा अपहार झाल्याच्या संदर्भात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी आठव्या आरोपीस अटक केली आहे.

घनसावंगी तालुक्यातील रांजणीवाडी, भुतेगाव ,कृष्णनगर गावांतील नैसर्गिक आपत्तीमुळे पीकहानीचे पंचनामे करण्यात आले होते. हे पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांची यादी संगणक प्रणालीवर 'अपलोड' करण्यात सहभाग आढळून आल्याच्या आरोपावरून कृषी सहाय्यक केशव कचकलवाड यास स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

२०२२ ते २०२४ दरम्यान विविध चार शासन निर्णयांद्वारे जालना जिल्हयातील शेतकऱ्यांना पीकांच्या नुकसानीसाठी अनुदान मंजूर करण्यात आले होते. अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील २४० गावांत वितरित या अनुदानात अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील २४० गावांत वितरित या अनुदानाच्या वितरणात गैरप्रकार झाल्याच्या संदर्भात जिल्हाधिकायांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने अहवाल सादर केला आहे. अंबड उपविभागीय महसूल कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी तथा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या फिर्यादीवरून अंबड पोलिसांनी यासंदर्भात गुन्हा नोंदविलेला आहे. त्यानंतर तपासासाठी हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.

डोळ्यांची गेलेली नजर पुन्हा होईल तीक्ष्ण! हे 'एक' फळ रोज खा; वाढत्या नंबरची समस्या होईल कमी, आचार्य बालकृष्णांनी सांगितली योग्य सेवन पद्धत

शेती नसणारे, इतर जिल्ह्यातील रहिवाशी यांना अनुदान वितरित करणे त्याचप्रमाणे क्षेत्र वाढ दाखवून आणि एका व्यक्तीस दोनदा अनुदान वितरित करण्यात आल्याचा आरोप आहे. 'महाआयटी' वरून विकसित करण्यात आलेल्या शासकिय संगणक प्रणालीचा गैरवापर करून अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत एकूण २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अपहार झाल्याचाआरोप आहे. जालना जिल्ह्यातील या घोटाळ्यामुळे अतिवृष्टीतील अनुदान देताना यंत्रणेने अधिकचे निकष लावले. 'केवायसी ' झाल्याशिवाय कोणालाही अनुदान दिले जाणार नाही असे ठरविण्यात आले. ही अट रद्द करावी अशी मागणी करण्यात आली होती. अनुदान वाटपातील हा घोळ जालना जिल्ह्यात अधिक प्रमणात असल्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी कृष्णा पांचाळ यांच्या लक्षात आले होते. त्यांनी दिलेल्या या अहवालाच्या आधारे आता अधिकची रक्कम वसुल कशी करायची असा प्रशासनासमोर पेच आहे.

शेती नसणाऱ्यांना अनुदान दिल्याचे लक्षात आल्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आठव्या आरोपीस आता अटक करण्यात आली आहे.

# महायुतीत फोडाफोडी कोण करतंय? भाजपा-शिवसेनेत ऑल इज नॉट वेल?



महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. दरम्यान शुक्रवारी रविंद्र चव्हाण यांनी केलेलं वक्तव्यही गाजलं, ते म्हणाले होते मला २ डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे. महायुतीत ऑल इज नॉट वेल आहे का? असाही प्रश्न समोर आला. दरम्यान महाराष्ट्रात शिवसेना आणि भाजप पक्षात फोडाफोडी सुरु आहे. या फोडाफोडीचा वाद थेट हाणामारीपर्यंत पोहचला आहे. फोडाफोडी कोण करतं आहे? भाजपा शिवसेना वादाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता उत्तर दिलं आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्याशी मी संवाद साधला आहे-शिंदे

शिवसैनिकांच्या भाजप प्रवेशाचा धडाका काही दिवसांपूर्वी पाहण्यास मिळाला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाणांच्या नेतृत्वाखाली भाजपानं ही फोडाफोडीची मोहीम राबवली होती. दिल्लीच्या हस्तक्षेपानं फोडाफोडी बंद झाली पण आता भाजप कार्यकर्त्यांनी मारामारी सुरु केलीय. ठाण्यात या हाणामारीचा पहिला अंक पाहायला मिळाला. भाजपा-शिवसेना संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीसांशी फोनवरुन चर्चा झाल्याची माहिती एकनाथ शिंदेंनी दिलीय. देवेंद्र फडणवीस यांच्याशी मी संवाद साधला आहे असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे. झी २४ तासच्या टू द पॉईंट या मुलाखत विशेष कार्यक्रमात एकनाथ शिंदेंनी मुलाखत दिली. त्या कार्यक्रमात त्यांनी हे भाष्य केलं आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, युती धर्म सगळ्यांनी पाळला पाहिजे. शिवसेना कायमच युती धर्म पाळत आली आहे. ही युती अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन यांच्यापासून बाळासाहेब ठाकरेंपासून चालत आलेली आहे. स्थानिक पातळीवर नेते काही विधानं करतात मात्र माझी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली आहे. तसंच यापुढे आम्ही हे ठरवलं आहे की शिवसेनेचे नगरसेवक भाजपात घेतले जाणार नाहीत आणि भाजपाचे शिवसेनेत घेतले जाणार नाहीत. आमचा अजेंडा विकासाचा आहे असंही एकनाथ शिंदे म्हणाले. इतकंच नाही तर परवा मी वाड्यामध्ये होतो तिथे काही काँग्रेसच्या नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये कुणी भाजपाचा नगरसेवक तर नाही ना? असेल तर त्याला पक्षात घेऊ नका असंही मी तिथे सांगितलं. माझ्यात आणि मुख्यमंत्र्यांमध्ये काहीही वाद नाहीत हे देखील एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केलं. खुर्ची ही आमच्यासाठी महत्त्वाची नाही. ती खुर्ची ज्यांच्यासाठी महत्त्वाची होती त्यांचं सरकार गेलं महाराष्ट्रातून असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. जी काही विधानं चालली आहेत त्याबाबत माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली आहे. आमच्यात योग्य समन्वय आहे असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# आरक्षण मर्यादेने राज्य सरकारची कोंडी! राज्य निवडणूक आयोगाची संयमी भूमिका

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने राज्य सरकारची पूर्ण कोंडी झाली आहे. या निवडणुका ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत घेण्याच्या न्यायालयाच्या आदेशाचा सर्वाधिक फटका विदर्भ आणि मराठवाड्याला बसणार असल्याने ओबीसींच्या नाराजीला सरकारला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे पुन्हा न्यायालयात जाण्याच्या हालचाली सरकारदरबारी सुरू झाल्या असून, निवडणूक आयोगाने मात्र 'संयमी' भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या पाच वर्षांपासून सर्वोच्च न्यायलयाच्या कचाट्यात अडकल्या आहेत. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने शुक्रवारी या निवडणुकांचा मार्ग सुकर करताना या निवडणुका सध्याच्या आरक्षणानुसार घेण्याची मुभा निवडणूक आयोगास दिली. मात्र याच आदेशात ५० टक्के आरक्षण मर्यादेतच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालायने दिला आहे.

आरक्षण मर्यादेत निवडणुका घेण्याच्या निर्णयाचा सर्वाधिक फटका विदर्भ आणि मराठवाड्याला बसणार आहे. या दोन्ही विभागात ओबीसींचे प्रमाण अधिक असल्याने आता तेथे आरक्षण कमी करणे भाजपला राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे पुन्हा न्यायालयात जाऊन महापालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन अंतिम निर्णयाच्या अधिन राहून घेण्याची मुभा द्यावी.

# ठाकरे बंधू एकत्र आल्याचा परिणाम होईल का? एकनाथ शिंदेंचं उत्तर

महाराष्ट्रातील नगपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात जोरदार प्रचार सुरु आहे. प्रचाराचा धुरळाच उडाला आहे. राज्यात लवकरच महापालिका निवडणुकीचं बिगुलही वाजणार आहे. महाराष्ट्रात महायुतीकडून जसा प्रचार सुरु आहे. दरम्यान राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंशी युती केली आहे. या सगळ्याचा कसा परिणाम होईल? याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाष्य केलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमकं काय म्हटलं आहे?

एकनाथ शिंदे म्हणाले, आमचा अजेंडा विकासाचा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अनेकदा सांगितलं आहे की विकास हाच प्रचाराचा मुद्दा आहे. लोकसभा, विधानसभा निवडणूकही याच मुद्द्यांवर आम्ही लढलो. निवडणूक म्हटली की टीका, टिप्पणी, राजकीय आरोप, इतर काही विधानं या गोष्टी होतात. लोकांना या सगळ्यात रस नसतो, त्यांना विकास कसा होतो आहे आणि आमच्या नगरपरिषदेला काय मिळेल यात रस असतो असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. एकनाथ शिंदे यांनी झी २४ तास या वृत्तवाहिनीतील टू द पॉईंट या कार्यक्रमात मुलाखत दिली. त्याच कार्यक्रमात एकनाथ शिंदेंनी हे भाष्य केलं आहे. खुर्ची ही आमच्यासाठी महत्त्वाची नाही. ती खुर्ची ज्यांच्यासाठी महत्त्वाची होती त्यांचं सरकार गेलं महाराष्ट्रातून असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. जी काही विधानं चालली आहेत त्याबाबत माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली आहे. आमच्यात योग्य समन्वय आहे असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. तसंच त्यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याबाबतही भाष्य केलं.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याबाबत काय म्हणाले एकनाथ शिंदे?

सायंदैनिक
राजस्व



# दागिने चोरणारी महिला २४ तासांत ताब्यात, ०३ लाखांचा ऐवज जप्त सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांची दमदार कारवाई

सोलापूर (प्रतिनिधी ) उघड्या घरातून दोन तोळे सोने व रोख रक्कम असा तीन लाखांचा ऐवज लंपास करणाऱ्या महिलेस पोलिसांनी ताब्यात घेतले, तिच्याकडून ३ लाखांचा मुद्देमाल जप्त करीत गुन्हा उघडकीस आणला. हा गुन्हा जेलरोड पोलिसांनी चोवीस तासात उघड केला आहे. आस्मा परवीन आरिफ जमादार (वय ४० रा. शास्त्री नगर सोलापूर) असे ताब्यात घेतलेल्या महिलेचे नाव आहे. तीच्याकडून शंभर टक्के रिकव्हरी मिळाली व महिला सराईत गुन्हेगार नसल्याने पोलिसांनी तीस नोटीस देऊन सोडून दिले आहे.



निजामुद्दीन इब्राहिम विजापुरे (वय २३, रा. रा. राबिया अपार्टमेंट, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मावस बहिण आस्मा यांच्यावर गुन्हा दाखल होता. अस्मा ही एक महिन्यापासून विजापूरे यांच्या घरात राहण्यासाठी होती. घरातील सर्व काही तिला माहित होते. तीने घरातील दोन तोळे सोने व ८० हजाराची रोख रक्कम असा एकूण ३ लाखांचा ऐवज लंपास केला होता. ही घटना २३ नोव्हेंबर रोजी कळाल्याने पोलिसांत फिर्याद दिल्याने जेलरोड पोलिसांत गुन्हा दाखल होता.

या महिलेस ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तीने दोन तोळे सोने व ८० हजार रुपये असा एकूण ३ लाखाचा मुद्देमाल लंपास केल्याची कबुली दिली. तो मुद्देमाल जेल रोड पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा २४ तासात उघडकीस आणल आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिवाजी राऊत पोलीस निरीक्षक भाऊराव बिराजदार सहा पोलिस निरीक्षक संदीप पाटील मपो अंमलदार अनुराधा गुत्तीकोंडा सफो एम. नदाफ गजानन कणगिरी पोलीस हवालदार वसंत माने धनाजी बाबर अब्दुल वहाब शेख पोलीस नाईक भारत गायकवाड इकरार जमादार उमेश सावंत युवराज गायकवाड कलप्पा देकाणे संतोष वायदंडे विठ्ठल जाधव यांनी केली.


## मुक्त आणि फ्रीलान्स पत्रकारांना असंगठित कामगाराचा दर्जा द्यावा

मुंबई – महाराष्ट्रातील मुक्त, फ्रीलान्स, डिजिटल रिपोर्टर, स्ट्रिंगर आणि स्वतंत्र प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या हजारो पत्रकारांना औपचारिक सेवा-सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना तातडीने 'असंगठित कामगार' म्हणून मान्यता देण्याची मागणी राज्याच्या कामगार मंत्र्यांकडे करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना दिलेल्या विस्तृत निवेदनात या पत्रकारांना भेडसावणाऱ्या असुरक्षिततेचे चित्र स्पष्ट केले असून त्यांच्या सामाजिक सुरक्षा, आरोग्य संरक्षण आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी तातडीची पावले उचलण्याची विनंती केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर मुक्त आणि फ्रीलान्स पद्धतीने पत्रकारिता करणारा वर्ग आहे. ग्रामीण, उपनगरी आणि शहरांमध्ये वृत्तपत्र, डिजिटल प्लॅटफॉर्म, न्यूज पोर्टल, टीव्ही आणि स्थानिक माध्यमांसाठी काम करणारे अनेक पत्रकार कोणत्याही संस्थेशी औपचारिक करारात नसतात. त्यांना नियमित वेतन, भविष्य निर्वाह निधी (PF), ESIC, आरोग्य विमा, पेन्शन, ग्रॅच्युइटी किंवा कोणतीही सामाजिक सुरक्षा सुविधा मिळत नाही. त्यांचे उत्पन्न हे assignment-based किंवा piece ate पद्धतीने असते. अशा स्वरूपाचा रोजगार Uno ganised Wokes Social Secuity Act, २००८ मधील असंगठित कामगारांच्या व्याख्येत स्पष्टपणे बसतो, असे कैतके यांनी अधोरेखित केले आहे.

पत्रात असे सांगण्यात आले आहे की हे पत्रकार लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची मुलभूत जबाबदारी निभावत असले तरी त्यांचे जीवन सतत धोक्यातून जात आहे. ग्रामीण व मागास भागातील अनेक पत्रकार वाहतूक, उपकरण, तांत्रिक सुविधा, इंटरनेट, सुरक्षितता आणि प्रसंगोपात येणाऱ्या कायदेशीर-प्रशासकीय अडचणी यांचा संपूर्ण भार स्वतः उचलतात. याउलट त्यांना कोणत्याही संस्थेकडून किंवा शासनाकडून सामाजिक सुरक्षा मिळत नाही. अनेक वेळा धोकादायक परिस्थितीत काम करूनही अपघात विमा किंवा आपत्कालीन मदतीचे कोणतेही संरक्षण उपलब्ध नसते. या परिस्थितीला राज्य सरकारने सकारात्मकतेने हाताळावे, असा आग्रह यामध्ये व्यक्त करण्यात आला आहे.

पत्रकार परिषदेने राज्य सरकारसमोर काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. मुक्त आणि फ्रीलान्स पत्रकारांना औपचारिकपणे 'असंगठित कामगार' म्हणून मान्यता देऊन त्यांची अधिकृत नोंदणी सुरू करावी. असंघटित काम



गार मंडळामार्फत पत्रकारांची तातडीने नोंदणी केली तर त्यांना सामाजिक सुरक्षा योजनांचे थेट लाभ मिळू शकतील. तसेच महात्मा ज्योतिराव फ ुले जनआरोग्य योजनेत पत्रकारांना समाविष्ट करून मोफत उपचार, आपत्कालीन सेवा आणि आरोग्य संरक्षण मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय अपघात विमा, पेन्शन, मातृत्व सहाय्य, आपत्कालीन आर्थिक मदत आणि इतर सामाजिक सुरक्षा योजना पत्रकारांसाठी खुल्या कराव्यात, असा आग्रह व्यक्त केला आहे.

निवेदनात असेही नमूद केले आहे की जिल्हा आणि तालुकास्तरावर पत्रकार ओळख पडताळणीची स्वतंत्र व पारदर्शक व्यवस्था उभारली गेली तर फेक किंवा बोगस पत्रकारांची समस्या कमी होऊन प्रत्यक्ष काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळू शकेल. नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या बातम्या, रिपोर्ट, फोटो, व्हिडिओ इत्यादींच्या आधारे पत्रकारांची पात्रता निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पत्राच्या शेवटी, मुक्त पत्रकारांचे काम महत्त्वाचे असून लोकशाहीच्या कार्यप्रणालीत त्यांचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ते जनतेच्या समस्या, प्रशासनातील त्रुटी, स्थानिक घडामोडी, सामाजिक मुद्दे आणि शासनाच्या निर्णयांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवतात. परंतु या कामासाठी आवश्यक असलेली संरक्षण व्यवस्था, सुरक्षितता आणि आर्थिक स्थैर्य नसल्याने हा वर्ग सतत जोखमीचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत शासनाने सकारात्मक आणि सहानुभूतीपूर्वक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांना सामाजिक सुरक्षिततेचा आधार द्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

पत्रावर अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी स्वाक्षरी केली असून राज्य सरकारने या गंभीर मुद्द्याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## नजीबभाई शेख महापालिका निवडणुकीत आयकॉन ठरतील अण्णा बनसोडे यांचा विश्वास



सोलापूर - (प्रतिनिधी)
शांत आणि संपमी नजीबभाई शेख अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीसाठी सोलापूर महानगर पालिका निवडणुकीत आयकॉन ठरतील, असा विश्वास विधानसभेचे उपसभापती आणि सोलापूरचे अजित पवार राष्ट्रवादीचे संपर्क मंत्री यांना बनसोडे यांनी व्यक्त केला.

शुक्रवारी दुसऱ्या दिवशीचा दौरा संपताना सायंकाळी उशीरा अण्णा बनसोडे यांनी सिव्हिल बौकातीत नजीबभाई शेख यांच्या निवासस्थानी भेट दिली. रोख परिवाराकडून अण्णा बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी आपण जीवाचे रान करू, असे अभिवचन नजीबभाई या त्यानी यावेळी आपणा बनसोडे यांना दिले.
सौतापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी आपण जीवाचे रान करू, असे अभिवचन नजीबभाई शैखा त्यांनी यावेळी अण्णा बनसोडे यांना दिले.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, माजी परिवहन आनंद मुरतारे महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, श्यामराव गांगर्ड शहर सचिव दत्तात्रय बनसोडे, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, वाहतूक सैल अध्यक्ष इरफान मोख प्रियंका पवार रोहित माने आदी मान्यवर उपस्थित होते.

## हॉटेल व बार या नावाखाली सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाचा ?



या प्रकरणात थोडक्यात हकीकत अशी की , स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस हेड कॉन्स्टेबल दीपाली सतयवान जाधव या सोलापूर तालुका पोलिस ठाणे हद्दीत गुरुवार दिनांक २७/११/२०२५ रोजी सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांच्या समवेत पोलिस उप निरीक्षक गायकवाड पोलिस कॉन्स्टेबल बाळराजे घाडगे पोलिस कॉन्स्टेबल दोरकर असे शासकिय वाहनातून पेट्रोलिंग करत असताना तांदुळवाडी सोलापूर गावच्या हद्दीत सोलापूर – हैद्राबाद रोड लगत असलेल्या हॉटेल रिंकी बार व लॉज या ठिकाणी सागर धानप्पा सोलापूरे हा त्याच्या स्मार्टफोनवरून ग्राहकांना महिलांचे फोटो पाठवून वेश्याव्यवसायातून मुली पुरवत आहे.अशी खात्रीलायक बातमी सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांना मिळाल्यानंतर या बातमीची तत्काळ सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांनी तत्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना कळविली .श्री जगताप यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांनी सापळा रचून सदर ठिकाणी धाड टाकली .

वायकर यांनी बनावट ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून कारवाईच्या अनुषंगाने तयारी केली. व ग्राहकास हॉटेल रिंकी बार व लॉजवर पाठविले. पोलिसांनी पाठविलेल्या बनावट ग्राहकाने सागर धानप्पा सोलापूर यास संपर्क साधून वेश्या व्यवसायासाठीच्या महिला पाहून व्यवहार ठरवून पोलिसांना खिडकीतून हात बाहेर काढून इशारा केला.

इशारा करताच सहाय्यक पोलिस निरीक्षक वायकर पोलिस कॉन्स्टेबल दोरकर यांनी यांनी पंचसमक्ष रिंकी हॉटेल बार व लॉजवर धाड टाकली.त्यावेळी त्या ठिकाणी खुर्चीवर बसलेल्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारताच त्याने त्याचे नाव अभिजित उर्फ सागर धानप्पा सोलापूरे वय ३६ वर्षे राहणार तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर असल्याचे सांगत या हॉटेल चा मालक असल्याचे पोलिसांना सांगितले. व सोलापूरे यास पोलिसांनी पाठविलेला बनावट ग्राहक हा लॉज म धील रूम नंबर १ येथे एका महिलेसोबत असल्याचे दिसले.

सापळा रचल्या प्रमाणे पोलिसांनी बनावट ग्राहकास हा काय प्रकार आहे ? असे विचारले तेव्हा त्या ग्राहकाने हॉटेल चालक – मालक सागर सोलापूरे कडे बोट दाखवून याने शरीर संबंध साठी ही महिला दाखविली. ती मी पसंत केल्यानंतर या महिलेचा दर दीड हजार रुपये ठरला असून मी सागर याला १५०० हजार रुपये दिले आहे .यानंतर बातमीची खात्री झाल्यानंतर पोलिस उप निरीक्षक गायकवाड यांनी अभिजित उर्फ धानप्पा सोलापुरे यास अटक केली. सागर सोलापूरे याने बनावट ग्राहकाकडून घेतलेली रक्कम ,स्मार्ट फोन , व निरोधचे पाकीट जप्त केले .

तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक वायकर यांच्या आदेशान्वये संगीता मुक्तिराम जाधव वय वर्षे ५० भवानी चौक ,चौथा झेंडा गणेश नगर धाराशिव मूळ पत्ता भाग्य नगर मु. पो. अहमदपूर धाराशिव या महिलेची महिला पोलिसां मार्फत अंग झडती घेतली असता तिच्याकडे विवो कंपनीचा स्मार्ट फोन मिळून आला.

स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता ताब्यात घेण्यात आलेली महिला संगीता मुक्तिराम जाधव हिने बनावट ग्राहकासोबत असलेल्या महिले वेश्या म्हणून शरीर संबंधासाठी गिऱ्हाईकाना पुरवत असताना मिळून आल्या. हॉटेल चालक अभिजीत उर्फ सागर धानप्पा सोलापूरे हा त्याच्या लॉजमधील खोल्यांचा वापर कुंटण खाण्यासाठी करत आहे.त्यामुळे पंचासमक्ष स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सुरू असलेला कुंटणखाना बंद पाडून हॉटेल चालक अभिजीत उर्फ सागर धानप्पा सोलापूरे व संगीता मुक्तिराम जाधव यांना ताब्यात घेतले.

व त्यांच्यावर सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध ? अधिनियम १९५६ प्रमाणे ३,४,५,६ नुसार तसेच भारतीय न्याय संहिता कलम १४४ २? प्रमाणे गुन्हा दाखल केला .या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षण राहुल देशपांडे करीत आहेत.

या अटक करण्यात आलेला आरोपी अभिजित उर्फ सागर धानप्पा सोलापूरे हा सत्ताधारी शिवसेना उपजिल्हाप्रमुख व माजी उपसरपंच असल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येतोय